D/dso/Mahalle/Pykka/krida shikshak parshikshan shibir/letter


# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, चंद्रपूर

## स्व. दादासाहेब कन्नमवार जिल्हा क्रीडा संकुल

सिव्हील लाईन, चंद्रपुर

E-mail :- dso_new@rediffmail.com Phone No :- 07172-257779


जाक्र/जिक्रीअ/क्रीशिप्रशि/सभा/२०१७-१८/1548 दिनांक :- १२/०३/२०१८.

प्रति,

मा. गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, ------------------
जि. चंद्रपूर

**विषय :- क्रीडा शिक्षकांसाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीर सन २०१७-१८.**
प्रशिक्षण शिबीराकरिता प्रति तालुका किमान ०७ क्रीडा शिक्षकांची नांवे पाठविण्याबाबत.

संदर्भ :- १ क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे पत्र क्र. क्रीयुसे/जिक्रीपप्रकेप्र/नॉप्ल/२०१७-१८/का-१३/ १२२९ दि. ०३/०३/२०१८.
२. दि. १२/०३/२०१८ रोजी झालेल्या सभेतील निर्देशनानुसार.

उपरोक्त संदभाकित विषयान्वये आपणास कळविण्यांत येते की आज दिनांक १२/०३/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. गट शिक्षणाधिकारी व तालुका स्पर्धा सयोजक यांच्या सभेचे आयोजन करण्यांत आलेले होते.

सदर सभेमध्ये क्रिडा शिक्षकांसाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीर सन २०१७-१८ चे आयोजन दिनांक १९ मार्च २०१८ ते २८ मार्च २०१८ या कालावधीत करण्यांचे योजले आहे. त्याकरीता प्रत्येक तालुक्यातुन किमान ०७ (पुरुष व महिला) क्रिडा शिक्षकाची नांवे दिनांक १५ मार्च २०१८ पर्यत जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयात पाठविण्यांत यावीत तसेच सोबत दिलेल्या फार्ममध्ये अचुक माहिती भरुन संबधित शिक्षकास तो फार्म घेवून १८ मार्च २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत उपस्थित राहण्याबाबत आदेशित करण्यांत यावे.

या शिबीरात खेळामधील बदललेले आधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षणाच्या पध्दती खेळामधील कौशल्याची ओळख नवीन खेळाची ओळख खेळाची शास्त्रोस्त्र माहिती देण्यांत येणार आहे तसेच आहारतज्ञ, शरीर विज्ञान तज्ञ, क्रीडा मानसोपचार तज्ञ यांना तज्ञ मार्गदर्शक म्हणून निमंत्रित केले जाणार आहे. तालुका, जिल्हा, विभाग, राज्यस्तरावर क्रीडा शिक्षकांच्या ज्ञानामध्ये भर पडावी व वेळोवेळी क्रीडा क्षेत्रामध्ये होणारे बदल अवगत होण्यासाठी जिल्हयातील शालेय शिक्षण विद्यार्थ्यांना योग्य क्रीडा प्रशिक्षण मिळण्यासाठी क्रीडा शिक्षकांचे अद्यावत प्रशिक्षण असणे आवश्यक आहे.

सदर क्रीडा प्रशिक्षण शिबीराकरिता आपल्या तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच शासन मान्यता प्राप्त अनुदानित - विना अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील क्रीडा शिक्षकांचा सहभाग होणे अपेक्षीत आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी,
चंद्रपूर

**प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर**

१) मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, म. रा. पुणे
२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा क्रीडा संकुल समिती, चंद्रपूर
३) मा. शिक्षणाधिकारी, (माध्यमिक / प्राथमिक) जि. प. चंद्रपूर